# अभिरवच्या जासूसकथा

डॉ. वर्षा जोशी



लहान मुलांना गोष्टी ऐकण्याची फार आवड असते आणि त्यांचे आईबाबा कामात व्यग्र असल्याने या गोष्टी सांगण्याचे काम साधारणपणे आजी आणि आजोबांचे असते.

अगदी लहान वयात काऊचिऊच्या गोष्टी, परीकथा, त्यानंतर इसापनीती, पंचतंत्रातील गोष्टी वगैरे ऐकून झाल्यावर मुले कुमार वयाची झाली की त्यांना त्यांच्याच वयाच्या मुलांनी एखाद्या गुन्ह्याचा शोध किंवा एखाद्या रहस्याचा भेद केलेल्या गोष्टी आवडू लागतात.

या पुस्तकात अभिरव, त्याचे मित्र, त्याची आणि त्यांची भावंडे यांनी गुन्हेगारांच्या लावलेल्या शोधांच्या गोष्टी आणि रहस्याचा भेद केलेली गोष्ट अशा आठ गोष्टींचा समावेश आहे. या गोष्टीही आजीनेच आपल्या नातवंडांना सांगितलेल्या आहेत. या गोष्टींमध्ये अभिरव हा कुमार वयाचा मुलगा मुख्य पात्र असल्याने पुस्तकाचे नाव अभिरवच्या जासूसकथा.

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींची जाणीव या मुलांना आहे. स्वतःची निरीक्षणशक्ती, जागरूकता आणि हुशारी वापरून, थोडीफार विज्ञानाची मदत घेऊन, मोठ्या माणसांची मदत घेऊन त्यातील गुन्ह्यांची उकल ही मुले करतात. घरातल्या वडीलधाऱ्या माणसांचा आदर करण्यासारखे उत्तम संस्कार या मुलांवर आहेत. काही कथा कोकणची पार्श्वभूमी असलेल्या आहेत. त्यातून तिथल्या आयुष्याची एक झलक बघायला मिळते.

सगळ्या कुमार वयाच्या मुलांना हे पुस्तक वाचायला नक्की आवडेल.

जासूसकथा
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ १००
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# अभिरवच्या जासूसकथा

लेखिका

डॉ. वर्षा जोशी

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०
www.chhatraprabodhan.org

♦ **‘अभिरवच्या जासूसकथा’**

♦ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, ‘छात्र प्रबोधन’,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 दूरभाष – (020) 24207 174/175
email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
website - www.chhatraprabodhan.org

♦ **लेखिका**
वर्षा जोशी
एफ्–१, ‘क्लॅरिऑन पार्क’,
गायकवाड पेट्रोलपंपाजवळ, औंध, पुणे – ७
मोबाइल – ९८२२०२४२३३, email - varshajoshi611@gmail.com
© स्वामित्व लेखिकेच्या स्वाधीन

♦ **अक्षरजुळणी व सजावट**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

♦ **मुद्रित शोधन**
रंजना दाते

♦ **मुखपृष्ठ व आतील चित्रे**
चंद्रशेखर जोशी

♦ **सुलेखन**
बाबू उडुपी

♦ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर श्रावण शके १९४४, ऑगस्ट २०२२

♦ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**

♦ **किंमत**
₹ १००/–

***'Abhiravchya Jasooskatha'***

# प्रस्तावना

नातवंडं म्हणजे दुधावरची साय. तिचं अप्रूप वेगळंच असतं. लहान मुलांना माया करून घेण्यासाठी तर आजी लागतेच; पण तिच्या गोष्टीही त्यांना तितक्याच आवडतात. अगदी लहान असताना काऊचिऊच्या गोष्टी, त्यानंतर इसापनीति, पंचतंत्र, राजाराणीच्या गोष्टी ऐकत मुलं मोठी होतात. मग त्यांना जासूसकथा ऐकण्याची मजा हवी असते. म्हणून तर भा. रा. भागवतांचा 'फास्टर फेणे' एवढा लोकप्रिय झाला!

म्हणून मग मी माझ्या नातवंडांना स्वत: बनवून 'अभिरवच्या जासूसकथा' सांगायला सुरुवात केली. मुलं त्यामध्ये गुंतून जाताहेत हे पाहिल्यावर आणखी कथा लिहिण्याचा आणि सांगण्याचा हुरूप मला आला. मुलांच्या निरीक्षणशक्ती आणि अंगभूत हुशारीचा उपयोग करून या कथांमध्ये मुले एकमेकांना मदत करून आणि मोठ्या माणसांची मदत घेऊन अनेक गुन्ह्यांचा छडा लावून गुन्हेगारांना पकडून देतात. यातले मुख्य पात्र म्हणजे अभिरव हा कुमारवयाचा मुलगा म्हणून या त्याच्या जासूसकथा.

माझे स्वत:चे वास्तव्य पुण्यात असल्याने आणि बालपणाचा बराच काळ कोकणात गेल्याने या कथांना पुणे किंवा कोकणची पार्श्वभूमी आहे. तरीपण मी नमूद करू इच्छिते की या सर्व कथांमधील व्यक्ती, स्थळे आणि प्रसंग संपूर्णतया काल्पनिक आहेत. यांचे कुणाशी किंवा कशाशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. गोष्टींमधून मुलांना संस्कृतीची ओळख व्हावी आणि त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे हाही एक हेतू या गोष्टी मुलांना सांगताना माझ्या मनात होता.

कुमारांसाठी अतिशय महत्त्वाचं कार्य करणाऱ्या ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे 'छात्र प्रबोधन' हे मासिक आहे. यांच्यातर्फे हे पुस्तक प्रकाशित होत आहे ही माझ्या दृष्टीने फार मोलाची गोष्ट आहे. या सर्व कथांचे बारकाईने वाचन करून मौलिक सूचना ज्यांनी केल्या त्या छात्र प्रबोधनच्या श्रीमती माधुरी गोडबोले यांचे मन:पूर्वक आभार

या गोष्टी सांगताना मला आणि ऐकताना माझ्या नातवंडांना जसा आनंद मिळाला तसाच आनंद हे पुस्तक वाचताना माझ्या सर्व बालमित्रांना मिळो, हीच सदिच्छा!

**– डॉ. वर्षा जोशी**

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ........ ६

१. पॉलिशवाल्यांना हिसका ........ ७

२. साखळीचोरांना अद्दल ........ १६

३. चिमुकल्याची सुटका ........ २७

४. भुतांची ऐशी तैशी ........ ३९

५. देवाचं पत्र ........ ४६

६. चोरांची धरपकड ........ ५७

७. तस्करांना चले जाव ........ ७४

८. पेटीचे रहस्य ........ ८७